# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

**(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)**

**सेंटर - १, ३२ मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.**

**दूरध्वनी : (०२२) ६९९६५५५५, फॅक्स : ६९९६५५९९ ई मेल:- info.mahasecurity@maharashtra.gov.in**


## -: जाहिरात :-

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या मुख्यालयात एकूण - २२ नग नविन टेलिफोन खरेदी करावयाचे आहेत. त्यांपैकी १६ टेलिफोनसाठी **EPABX** मशीन पासून वायरिंगचे आवश्यक ते काम करणे यासाठी प्रस्तूत जाहिरात देण्यात येत आहे.

इच्छूक पुरवठादार यांनी सदरची जाहिरात सविस्तर वाचून त्यात नमुद सर्व कामकांजाकरिता आपले दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात कार्यालयाच्या नमूद पत्यावर **दि. २०.०१.२०२५ ते दि. ०७.०२.२०२५** रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत सकाळी ९.४५ ते सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत सादर करावी.

सविस्तर जाहिरातीकरिता महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in आणि https://mahasecurity.gov.in/ वेबसाईटला भेट द्यावी.

**Sd/-**

**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**

**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**

## १. प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ हे शासनाचे वैधानिक महामंडळ आहे. महामंडळाच्या मुख्यालयात एकूण - २२ नग नविन टेलिफोन खरेदी करावयाचे आहेत. त्यांपैकी १६ टेलिफोनसाठी **EPABX** मशीन पासून वायरिंगचे आवश्यक काम करणे, यासाठी प्रस्तूत जाहिरात देण्यात येत आहे.

### <u>अ) टेलिफोन खालील कंपनी आणि स्पेसिफिकेशन प्रमाणे आवश्यक आहेत.</u>

| अ. क्र. | टेलिफोन प्रकार | कंपनीचे नाव | टेलिफोन मॅडेल | टेलिफोन स्पेसिफिकेशन |
|---|---|---|---|---|
| **1** | **Digital**<br> | **Panasonic** | **M60N** | ❖ LCD Back Light<br>❖ LCD Contrast 4 Levels<br>❖ Desk Mount tilt (2 Position)<br>❖ Speaker Phone Volume 8 Levels<br>❖ Ringtone 30<br>❖ Soft Keys 4<br>❖ Programmable Keys 24<br>❖ Navigator & Cancel Key<br>❖ Mic Mute<br>❖ Outgoing - Incoming Call Log<br>❖ External Expansion 1 XDP / DXDP |
| 2 | **Display**<br> | **Beetel** | **M500** | ❖ FSK/DTMF Caller ID Compatible<br>❖ 30 Incoming Calls Memory<br>❖ 16 Digit LCD Display<br>❖ Adjustable LCD Contrast<br>❖ Local Area Code Setting<br>❖ Two Way Speaker Phone<br>❖ Mute Function<br>❖ Ringer Volume Control<br>❖ **M500 Caller ID Phone**<br>❖ Color Available |
| 3 | **Without Display**<br> | **Beetel** | **B11** | ❖ Ringer Volume Control<br>❖ Tone Pulse Switchable<br>❖ Ringer LED Indication<br>❖ Mute Function<br>❖ Desktop / Wall Mountable<br>❖ Colour Available |

**ब) EPABX मशीन पासून ते कर्मचा-यांच्या टेबलपर्यंत एकूण -१६ नग टेलिफोनचे वायरिंग करणेसाठी लागणा-या साहित्याच्या स्पेसेफिकेशनस खालील प्रमाणे.**

| Sr. No. | Description & Model | Rate | Qty | Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | D-Link Cat 6 UTP Cable supply & Installation with Cassing Pattie & Electrical accessories (in Meter) per Mater Rate (at actual) | | | |
| 2 | Face Plate with telephone sockets | | | |
| 3 | Installation Charges - telephone extension connection & testing | | | |

**इच्छूक दरपत्रकधारक यांनी मुख्यालयात प्रत्यक्ष पहाणी करावी आणि त्यानंतर दरपत्रके सादर करावीत. कार्यालयात प्रत्यक्ष पाहणीसाठी सकाळी १०.३० ते १८.०० या वेळेत येता येईल.**

**२) पुरवठादार यांनी सादर करावयाची कागदपत्रे :-**

१. पॅनकार्ड / आधार कार्ड / पासपोर्ट / मतदार व ओळखपत्र इ. पैकी कोणतेही एक ओळखपत्र.

२. पुरवठादारांच्या नावे GST अंतर्गत नोंदणी असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

**३) दरपत्रक सादर करण्यासाठी कार्यालयाचा पत्ता :-**

मा. व्यवस्थापकीय संचालक तथा पोलीस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.
सेंटर - १, ३२ वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी क्र.: (०२२)६९९६५५५५,
ई-मेल आय.डी. - **info.mahasecurity@maharashtra.gov.in**

**४) दरपत्रक सादर करण्याचा कालावधी :-**

दि. २०.०१.२०२५ ते दि. ०७.०२.२०२५ रोजी सायंकाळी १८.०० वाजेपर्यंत.

**५) दरपत्रक उघडण्याची दिनांक :-**

दि. १०.०२.२०२५ वेळ १२.०० वाजता.

**६) <u>इतर सूचना :-</u>**

१. दरपत्रक उघडतेवेळी दरपत्रकधारक यांनी स्वत: उपस्थित रहाणे आवश्यक आहे. उपस्थित न राहिल्यास दरपत्रक रद्द समजण्यात येईल.

२. दरपत्रकामध्ये कामकाजाबाबतचा सर्व तपशील अचुक नमूद करणे आवश्यक आहे.

३. दरपत्रकामध्ये वस्तूची मूळ किंमत त्यांची Installation rate व इतर कर - जी.एस.टी., इत्यार्दीबाबींकरीता येणारा खर्च स्पष्ट व स्वतंत्रपणे नमूद करण्यात यावा.

४. सदरच्या कामकाजाकरिता किती कालावधी लागेल याचा स्पष्ट उल्लेख दरपत्रकामध्ये करण्यात यावा.

५. दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात पोस्टाने कुरीअरद्वारे पाठविण्यात येत असल्यास अंतिम दिनांकापुर्वी महामंडळाच्या कार्यालयास पोहोच होतील याची दक्षता घ्यावी. मुदतीनंतर प्राप्त झालेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

६. एका वेळेस एकच दरपत्रक सादर करणे आवश्यक आहे. एका पुरवठादाने अनेक दरपत्रक सादर केल्यास त्याची सर्व दरपत्रके बाद करण्यात येतील.

७. दरपत्रकधारक यांची G.S.T. अंतर्गत नोंदणी अनिवार्य आहे.

**७) <u>निवड प्रक्रिया :-</u>**

१. निवड केलेल्या पुरवठादारास निवड केल्याबाबतचे पत्र ई-मेल किंवा पत्राद्वारे कळविले जाईल.

२. निवड प्रक्रियेदरम्यान आवश्यकता भासल्यास (Negotiation) कार्यालयास हजर रहावे लागेल.

३. कामकाजपूर्ण झाल्यानंतर महामंडळास पुरवठादारांनी टॅक्स इनव्हाईस (Tax Invoice) सादर करावे व त्यानंतर त्यांना देयक अदा करण्यात येईल. टॅक्स इन्व्हाईसमध्ये पुरवठादाराचा जी.एस.टी. क्रमांक, पॅन क्रमांक आणि बँकेचा तपशील नमूद असणे आवश्यक आहे.

४. सदर निवड प्रक्रिया कोणत्याही वेळी / कोणत्याही कारणास्तव / कोणत्याही टप्प्यावर / पुर्णत: किंवा अंशत: रद्द करण्याचा / फेरबदल करण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई यांचेकडे राखून ठेवण्यात आलेला आहे.

**Sd/-**
**पोलीस महासंचालक तथा व्यवस्थापकीय संचालक**
**महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.**